राज्य मराठी विकास संस्था, मुंबई संस्थेतील अधिकारी/कर्मचारी यांना ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
शासन निर्णय क्रमांक: वेतन-२०१९/प्र.क्र.५०/आस्था-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १३ ऑगस्ट, २०१९

वाचा :- १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. वेपुर-२०१८/प्र.क्र.४४/सेवा-९, दिनांक ०१.०१.२०१९.
२) शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्र. वेपुर-२०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दिनांक ३०.०१.२०१९.

प्रस्तावना :-

राज्य शासकीय कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने दिनांक ०१.०१.२०१६ पासून सुधारित वेतन संरचना लागू करण्यात आल्या आहेत. त्याच धर्तीवर राज्य मराठी विकास संस्था या १००% शासन अनुदानीत संस्थेतील अधिकारी/कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

शासन निर्णय :-

मराठी भाषा विभागाच्या अधिनस्त असलेल्या “राज्य मराठी विकास संस्था” या १००% शासन अनुदानीत संस्थेतील अधिकारी / कर्मचारी यांना सोबत जोडलेल्या “प्रपत्र-अ” मध्ये दर्शविल्यानुसार दिनांक ०१.०१.२०१६ पासून सुधारित वेतनसंरचना मंजूर करुन सुधारित वेतनाचा प्रत्यक्ष आर्थिक लाभ दिनांक ०१.०१.२०१९ पासून देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. या सुधारित वेतनसंरचनेतील वेतननिश्चिती शासन अधिसूचना, वित्त विभाग, दिनांक ३०.०१.२०१९ नुसार निर्गमित करण्यात आलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ आणि शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. वेपुर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दिनांक २०.०२.२०१९ नुसार करण्यात यावी. या नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या सुधारित वेतनश्रेणीत वेतन घेण्याबाबतचा विकल्प सदर कर्मचा-यांनी हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ०१ महिन्याच्या आत देण्यात यावा.

दिनांक ०१.०१.२०१६ ते दिनांक ३१.१२.२०१८ या कालावधीतील अनुज्ञेय थकबाकीसंदर्भात स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

३. यासाठी होणारा खर्च “मागणी क्र. झेडएफ-०२, मुख्य लेखाशीर्ष २२०५, कला व संस्कृती, १०२, कला व संस्कृती प्रचालन, (०१) (०४) राज्य मराठी विकास संस्था (अनिवार्य) (२२०५ ३१६१) ३६-सहायक अनुदाने (वेतन)” या लेखाशीर्षाखालील अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २७७/२०१९/सेवा-९, दिनांक १८.०७.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८१३१२५२४७२९३३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MANGESH PARSHURAM KUDTARKAR

Digitally signed by MANGESH PARSHURAM KUDTARKAR
DN: CN = MANGESH PARSHURAM KUDTARKAR, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = MARATHI LANGUAGE
Date: 2019.08.13 16:20:59 +05'30'

(मं. प. कुडतरकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१ महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१, मुंबई
२ महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१, मुंबई
३ प्रधान सचिव, मराठी भाषा विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४ अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
५ निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
६ सहसंचालक, लेखा व कोषागरे, संगणक कक्ष, मुंबई
७ संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
८ वित्त विभाग- कार्या. सेवा-९ / व्यय-४ / अर्थसंकल्प ३ व १३, मंत्रालय, मुंबई
९ निवड नस्ती (आस्था-२)

मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. वेतन-२०१९/प्र.क्र.५०/आस्था-२ , दिनांक १३.०८.२०१९ सोबतचे "प्रपत्र - अ"

अ.क्र.	पदाचे नाव	मंजूर पद संख्या	सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड	सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी	सुधारीत वेतनश्रेणी	
					वेतनस्तर	मॅट्रिक्समधील वेतन
१	संचालक	१	PB-४	३७४००-६७०००+८७००	S-२७	११८५००-२१४१००
२	उपसंचालक	१	PB-४	३७४००-६७०००+८७००	S-२७	११८५००-२१४१००
३	वरिष्ठ संशोधन सहायक	१	PB-३	१५६००-३९१००+७६००	S-२५	७८८००-२०९२००
४	प्रशासकीय अधिकारी	१	PB-३	१५६००-३९१००+६६००	S-२३	६७७००-२०८७००
५	कनिष्ठ संशोधन सहायक	१	PB-३	१५६००-३९१००+५४००	S-२०	५६१००-१७७५००
६	लेखा अधिकारी	१	PB-२	९३००-३४८००+४६००	S-१६	४४९००-१४२४००
७	कार्यासन अधिकारी	१	PB-२	९३००-३४८००+४४००	S-१५	४१८००-१३२३००
८	लघुलेखक (निम्नश्रेणी)	१	PB-२	९३००-३४८००+४३००	S-१४	३८६००-१२२८००
९	सहायक	३	PB-२	९३००-३४८००+४२००	S-१३	३५४००-११२४००
१०	रोखपाल	१	PB-१	५२००-२०२००+१९००	S-६	१९९००-६३२००
११	लिपिक-टंकलेखक	२	PB-१	५२००-२०२००+१९००	S-६	१९९००-६३२००
१२	वाहनचालक	१	PB-१	५२००-२०२००+१९००	S-६	१९९००-६३२००
१३	शिपाई	१	१S	४४४०-७४४०+१३००	S-१	१५०००-४७६००